महाराष्ट्र शासन
# कार्यालय, विभागीय शिक्षण सहसंचालक,
## (उच्च शिक्षण), नांदेड विभाग, नांदेड
(शासकीय तंत्रनिकेतन परिसर, नादेड- 431602, फोन/फॅक्स 02462-253144), ईमेल पत्ता: jdhe.nanded@yahoo.co.in

जा.क्र. विशिसंसं/उशि/नांवि / /2024-25/ 1933 दिनांक 23 / 07/ 2024

**महत्वाचे परिपत्रक**

**प्रति,**

1. कुलसचिव,
   स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
2. प्राचार्य,
   शासकीय, अशासकीय अनुदानित, कायमविना अनुदानित महाविद्यालये,
   नांदेड विभाग, नांदेड

**विषय :-** **श्री. चंद्रकांतदादा पाटील मा. मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचा विद्यार्थी पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद**

**संदर्भ :-** 1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण -2017/प्र.क्र.332/तांशि-4 दि.7.10.2017
2. शासन निर्णय क्र. शिष्यवृ-2024/प्र.क्र.105/तांशि-4 दि.08.07.2024
3. शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) म.रा. पुणे यांचे पत्र क्र.उशिस शिष्यवृत्ती/व्या.अ.प्र.मु./2024 दि.23.07.2024

उपरोक्त विषय संदर्भीय 03 च्या परिपत्रकाचे अवलोकन व्हावे. शासन निर्णयानुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टिने राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरीता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत **श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. 25. 07.2024 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 दरम्यान Webinar च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.**

तरी या कार्यकमाचे Live प्रक्षेपण आपापल्या संस्थेमध्ये मोठया पडद्यावर (Screen) सर्व विद्यार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल अशा पध्दतीची व्यवस्था करण्यात यावी व याकरीता आपापल्या संस्था / विद्यापीठ / महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व पालक यांना सदर कार्यक्रमास उपस्थित राहणे बाबत सूचना आपल्या स्तरावरुन देण्यात याव्या.

या कार्यक्रमासाठी Webinar ची लिंक खालीलप्रमाणे आहे.

http://www.parthlive.com

सोबत :- परिपत्रक

**( संभाजी सुर्यवंशी )**
प्रशासन अधिकारी,
उच्च शिक्षण नांदेड विभाग,नांदेड.

प्रत:- 1. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, म. रा. पुणे यांना माहितीस्तव सादर.

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -411001

E-mail- schol.dhepune@gov.in
web : www.dhepune.gov.in
फॅक्स 020/26111153
फोन नं -020/29707098/26126939

दिनांक-

क्र.उशिंस शिष्यवृत्ती/ व्या.अ.प्र.मु./2024

**महत्वाचे परिपत्रक**

**विषय - श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा.मंत्री उच्च व तंत्रशिक्षण विभाग, यांचा विद्यार्थी पालक व संस्था प्रतिनिधी यांचेशी संवाद.**

संदर्भ - 1. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-2017/प्र.क्र 332/तांशि-4,दि.7.10.2017
2. शासन निर्णय क्र. शिष्यवृ-2024/प्र.क्र105/तांशि-4,दि.8जुलै,2024

शासन निर्णय दि. 07.10.2017 नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/ तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे, शासकिय अभिमत विद्यापीठे(खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगरव्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम रु.8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कात 100 टक्के लाभ देण्यात येतो.

आता शासन निर्णय क्र.2 नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे,शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठ /स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेव्दारे(Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील/संस्था स्तरावरील प्रवेश वगळून)प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामायिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन ऐवजी 100 टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच वरीलप्रमाणे शैक्षणिक शुल्क व परिक्षा शुल्क यामध्ये 100 टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पर्वीपासून प्रवेशि असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या),महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दि.06.04.2023 मध्ये नमुद केलेला"संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांनासुध्दा अनुज्ञेय करण्यात येत आहे.

वरीलप्रमाणे घेण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार आणि उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टिने राबविण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरीता राज्यातील सर्व विद्यार्थी, पालक व संस्था प्रतिनिधी यांचे सोबत **श्री. चंद्रकांतदादा पाटील, मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, दि. 25.जुलै 2024 रोजी सकाळी 10.00 ते 12.00 दरम्यान Webinar च्या माध्यमातून संवाद साधणार आहेत.**

तरी, या कार्यक्रमाचे LIVE प्रक्षेपण आपापल्या संस्थामध्ये मोठ्या पडद्यावर (Screen वर) सर्व विद्यार्थी व पालक यांना दिसेल व ऐकू येईल अशा पध्दतीची व्यवस्था करण्यात यावी व याकरीता आपापल्या संस्थेतील/ विद्यापीठ / महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी व पालक यांना सदर कार्यक्रमास संस्थेत उपस्थित राहणे बाबत सूचना आपल्या स्तरावरून देण्यात याव्या.

या कार्यक्रमासाठी Webinar ची लिंक खालीलप्रमाणे आहे.

**http://www.parthlive.com**

प्रत माहितीकरीता-

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत आवश्यक कार्यवाहीकरीता-

सर्व सहसंचालक, उच्च शिक्षण कार्यालये, यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी आपापल्या विभागांतर्गत येणाऱ्या सर्व विद्यापीठे,संस्था, महाविद्यालये यांना अवगत करावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 23-07-2024 11:54:27

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-1